# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-४३२-२०२४ दिनांक-१४/११/२०२४

## प्रेस नोट

### “ गावठी हातभट्टीची दारु तयार करणाऱ्या अडयावर छापा टाकुन लाखोंचा मुद्देमाल नष्ट करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण कक्ष यांना यश.”

आगामी २०२४ विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अवैधरित्या देशी दारु विक्री अगर वाहतुक करणारे इसम तसेच गावठी दारु निर्मीती करणाऱ्या भटयांची माहीती काढुन त्या नष्ट करण्याबाबत मा.वरीष्ठांकडुन आदेश प्राप्त झालेले आहेत.

मा. वरीष्ठांकडुन मिळालेल्या आदेशानुसार अवैद्य धंदयाची माहिति काढत असताना दिनांक १३.११.२०२४ रोजी पोहवा/ शिवाजी पाटील यांचे गोपनीय बातमीदाराचे मार्फतीने मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण कक्षाचे पथकाला माहीती मिळाली की, प्रभाकर भोये, रा. सागपाडा, धानीवबाग, नालासोपारा पुर्व हा पेल्हार पोलीस ठाणे हद्दीतील मौजे हरवटेपाडा, देवेंद्र वेलफेअर, आदीशक्ती चाळ, धानीवबाग, शिवमंदीर रोड येथुन २ किलोमीटर आतमध्ये डोंगरात गैरकायदेशीर गावठी हातभट्टीची दारु तयार करीत आहे. सदर मिळालेल्या बातमीवरुन नमुद ठिकाणी दोन पंचासमक्ष सकाळी ०८.१० वाजता सपोनि/दत्तात्रय सरक, पोहवा.संतोष मदने, शिवाजी पाटील, हनुमंत सुर्यवंशी, गोवींद केंद्रे, सतीष जगताप, राजाराम काळे, पोअं/अकील सुतार, साकेत माघाडे, नितीन राठोड या पथकाने छापा घालुन १) २८०० लिटर नवसागर गुळ मिश्रीत वॉश २) १४० लिटर गैरकायदा गावठी हातभट्टीची दारु तसेच गावठी हातभट्टीची दारु तयार करण्याची साधने असा एकुण १,४२,०००/-रुपये किमतीचा मुद्देमाल मिळुन आला असुन आरोपी प्रभाकर भोये रा.सागपाडा, धानीवबाग, नालासोपारा पुर्व याचे विरुध्द पोहवा/शिवाजी रामचंद्र पाटील, मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण कक्ष यांनी सरकारतर्फे दिलेल्या तक्रारीवरुन पेल्हार पोलीस ठाणे गुनोक्र.८४१/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ब)(क)(ड)(फ)(ई) प्रमाणे दिनांक १३.११.२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) व श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, पोनिरी. धनंजय पोरे, सपोनि. दत्तात्रय सरक, नितीन बेन्द्रे, पोउपनिरी. हितेंन्द्र विचारे, सपोउपनि.श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा.संतोष मदने, शिवाजी पाटील, हनुमंत सुर्यवंशी,

अनिल नागरे, पोशि/साकेत माघाडे अखिल सुतार, नितीन राठोड, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.





**----0000----**